संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# आता स्मार्ट रेल्वे स्थानकांसाठी रेल्वेचा पुढाकार

**केंद्रीय** मंत्रिमंडळाने अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन देशभरातील रेल्वे प्रवाशांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. स्वातंत्र्यानंतर रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच देशातील ४०० रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जाणार आहे. आतापर्यंत रेल्वे स्थानकांची बांधणी स्वच्छता या सगळ्या गोष्टी रेल्वे खात्यातर्फेच केल्या जात होत्या. आता पहिल्यांदा रेल्वे स्थानकांच्या सुधारणांकरता खाजगीकरणाचा मार्ग अवलंबला आहे. विशेष म्हणजे या पुनर्विकासात स्विस मॉडेल वापरले जाणार आहे. यामध्ये खाजगी बांधकामकर्त्यांना अधिकाधिक चांगले प्रस्ताव सादर करण्याची संधी दिली जाणार आहे. जर एखाददुसऱ्या बांधकाम करणाऱ्याने एखादी चांगली सूचना केली तर त्याचा अंतर्भाव हे बांधकाम करू इच्छिणाऱ्याने केला पाहिजे. थोडक्यात खाजगीकरणामध्ये अधिक स्पर्धा आणण्याचा प्रयत्न केला जाईल असे दिसते. महाराष्ट्रातली लोकमान्य टिळक टर्मिनस, दादर, ठाणे, कल्याण, छत्रपती शिवाजी टर्मिनस पुणे, नागपूर, सोलापूर या स्थानकांचा आधुनिक पध्दतीने पुनर्विकास केला जाणार आहे. ज्यामध्ये सर्व प्रकारच्या सोयी सुविधा देण्याचा प्रयत्न राहील. ज्यामध्ये वाय-फाय सुविधा शॉपिंग कॉम्प्लेक्स, स्वच्छ आणि दर्जेदार रेस्टॉरंट सर्व सुविधांनी युक्त वेटिंगरुम, बहुमजली पार्किंग रेल्वे स्थानकात येणाचे आणि जाण्याचे वेगवेगळे मार्ग अशा प्रकारे अत्याधुनिक स्वरुपात रेल्वे स्थानकांचा कायापालट करण्याच्या निर्णयाला मंजुरी दिली गेली आहे. एकिकडे रेल्वेच्या कोणत्याही सुविधेचे खाजगीकरण केले जाणार नाही. असे पंतप्रधान नरेंद्र मोदी सांगत होते. तर दुसरीकडे खाजगीकरणाशिवाय रेल्वे कारभारात सुधारणा होऊ शकणार नाही असे रेल्वे मंत्र्यांना वाटत होते. आज जागतिक स्पर्धेचा विचार केला तर सरकारकडून अत्याधुनिक स्वरूपाची सुधारणा होणे शक्य दिसत नाही. कारण सगळी सरकारी यंत्रणा भ्रष्टाचाराने इतकी बरबटली आहे की जागतिक दर्जाची सुधारणा होण्याची सुतराम शक्यता नाही. दिल्ली, मुंबई, चेन्नई या ठिकाणी सुरु झालेल्या मेट्रो रेल्वे खाजगीकरणामुळेच वेगाने पूर्ण होऊ शकले. आणि त्याची देखभालही त्या दर्जाची होऊ शकली. हिच कामे रेल्वे खात्याकडे असती तर त्याचे भवितव्य बेभरोशाचेच ठरले असते. जर रेल्वेने आपल्या मालकीच्या स्थानकांच्या नव्या पद्धतीने विकास करुन शिवाय कोणताही खर्च न करता प्रवाशांना सुविधा देण्याचे ठरवले असेल तर त्याचे स्वागत करायला हरकत नाही.

## कार्यक्षमता आणि भ्रष्टाचार

आज जगामध्ये भारतीय रेल्वेचे जाळे सर्वात मोठे मानले जाते. कारण देशातील जवळपास ७०,००० किलोमीटरचे रेल्वे मार्ग असलेला भारत हा एकमेव देश ठरतो. देशाच्या सर्व भागांमध्ये रेल्वे पोहचली आहे. त्याचा सामान्य माणसाला फायदा होतोच, त्याशिवाय सर्वात महत्वाचे देशाच्या औद्योगिक प्रगतीमध्ये रेल्वेचा फार मोठा वाटा आहे. रेल्वेला माल वाहतुकीतून मोठा नफा होतो. आणि देशातील कोट्यावधी प्रवासी रेल्वे प्रवासाचा लाभ घेत असतात. आज वेगाने आणि सर्वांना परवडणारी रेल्वे व्यवस्था अधिक भक्कम होणे गरजेचे आहे. प्रामुख्याने रेल्वे स्थानकांची दुर्दशा पाहिल्यावर रेल्वे मंत्रालयाकडून त्याची देखभाल होणे शक्य दिसत नाही. खरे तर आज देशातील सर्वाधिक कर्मचारी असणारी रेल्वे ही एक मोठी यंत्रणा मानली जाते. तरीदेखील रेल्वेचा कारभार नियंत्रणात ठेवणे रेल्वे मंत्रालयाला शक्य होत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या विभागात होणारे राजकीय हस्तक्षेप आणि भ्रष्टाचार म्हणावे लागतील. एवढ्या अनेक वर्षांत रेल्वेला साध्या साध्या गोष्टींमध्ये सुधारणा करता आल्या नाहीत. रेल्वे स्थानके स्वच्छ ठेवता आली नाही. एवढेच नव्हे तर तिकिटे देण्यासाठी आधुनिक व्यवस्था निर्माण करता आली नाहीत. माहिती तंत्रज्ञानामुळे सगळ्या जगात वेगाने विकास होत आहे. पण त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून रेल्वे खात्याला वेग घेता आला नाही. याचा अर्थ तंत्रज्ञानामुळे रेल्वे कारभारामध्ये जी कार्यक्षमता वाढायला हवी होती ती वाढली नाही. कारण वेग आणि कार्यक्षमता याचा रेल्वे मंत्रालयाला मेळ घालता आला नाही. भ्रष्टाचार हे त्यामागचे आणखीन एक प्रमुख कारण आहे. आज तंत्रज्ञानामुळे भ्रष्टाचारसुद्धा कमी होऊ शकतो. परंतु त्याचा शंभर टक्के वापर करण्याची रेल्वेची इच्छाशक्ती दिसत नाही. कदाचित या सगळ्या उणिवा आणि त्रुटी लक्षात घेऊन खाजगीकरणाच्या माध्यमातून विकासाला वेग देण्याचे ठरवले गेले असावे. लोकांना आज चांगली दर्जेदार सेवा हवी आहे. यासाठी ते जास्त पैसे द्यायलाही तयार आहेत.ही सेवा मिळत नसल्यामुळे लोकांना बराच त्रास सहन करावा लागतो. मध्यंतरी तर ज्यांच्याकडे पैसा आहे अशा लोकांनी रेल्वेपेक्षा विमानाने प्रवास करणे पसंत केले. रेल्वेचा यामध्ये बराच तोटाही झाला. सगळे जग बदलत असताना भारतीय रेल्वे जुनाट पद्धतीने काम करीत राहिली, तर लोकांचा तिच्यावरचा विश्वास उडू शकतो. हा धोका पत्करण्यापेक्षा खाजगीकरणातून विकास केलेला सर्वांच्याच फायद्याचा ठरेल.

## दर्जेदारपणा हवा

आज रेल्वेला देशाची जीवनवाहिनी म्हटले जाते. मुंबईसारख्या घडाळ्याच्या काट्यावर धावणाऱ्या महानगरीत उपनगरी रेल्वेत सेवा सुधारणे आवश्यक आहे. यासाठी छत्रपती शिवाजी टर्मिनस, कल्याण, ठाणे, दादर या गर्दीच्या स्थानकांना अत्याधुनिक स्वरूप दिले गेले पाहिजे. जागेजागी टंचाई जरी असली तरी आहे त्या जागेचा अधिक चांगल्या पद्धतीने उपयोग करता येऊ शकतो. मुंबईप्रमाणे पुणे, नागपूर, सोलापूर किंवा मध्यम स्वरूपाच्या रेल्वे स्थानकांची सुधारणा गरजेची ठरते. कारण ही स्थानके आता मुंबईसारखीच गर्दीची ठरू लागली आहे. प्रवाशांना स्वच्छ आणि दर्जेदार सेवासुविधा देणारी स्थानके हवी आहेत. रेल्वे ती देऊ शकते. फक्त यासाठी जो वेग आणि कौशल्य हवे आहे ते खाजगीकरणातूनच मिळू शकेल अशी आज तरी परिस्थिती दिसते त्याचे अगदी छोटेसे उदाहरण द्यायचे तिकिट विक्रीचे देता येईल. रेल्वेच्या खिडक्यांवर लांबचलांब रांगा असतात आणि त्याच्या शेजारी एटीव्हीएम मशीनवरून तिकिटे देणाऱ्या खाजगी माणसांकडे रांगा लावण्याची वेळ येत नाही. कारण वेगाने तिकिटे देण्याचे तंत्र त्या मशिन्समध्ये आहे. शिवाय अधिकाधिक तिकिटे दिली तर आपल्याला जास्तीत जास्त कमिशन मिळेल या हेतूने वेगाने तिकिटे दिली जातात. या छोट्याशा खाजगीकरणाचा उपयोग लोकांना मोठ्या प्रमाणावर होतो. हेच प्रयोग जर मोठ्या प्रकल्पांसाठी राबवले गेले तर रेल्वेचा पैसा वाचेल. आणि चांगल्या दर्जाची वेगवान सेवा प्रवाशांना मिळू शकेल. भारताला जगातल्या मोठ्या देशांशी स्पर्धा करायची असेल तर जागतिक दर्जाची व्यवस्था निर्माण करण्याशिवाय पर्याय नाही. नुसती स्मार्ट सिटी उभी राहून उपयोगाचे नाही, तर त्या सिटीमध्ये रेल्वे स्थानक, बस स्थानक किंवा अगदी टॅक्सी रिक्षा स्टँडसुद्धा आधुनिक झाले पाहिजे.